**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 356 (CCCLVI)
ISSN : 2278-9308
June, 2022

# कैलास लेणीतील रावणानुग्रह शिल्प

डॉ अरविंद सोनटक्के
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,
भोकर, जि.नांदेड

सौ. वर्षा अरविंद सोनटक्के
संशोधक विद्यार्थिनी
varshasontakke78@gmail.com

भारतातील पहिली ज्ञात देवता शिव आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. शिवानेच या वैदिक परंपरेला असंख्य कथा दिल्या. शिव योगापासून भोगा पर्यंत, सर्व शाखांचा उद्गाता, विषा (हलाहल) पासून गांजा पर्यंत, कामापासून वैराग्य पर्यंत पुरुषोत्तमाचे सर्व बिंदू शिवा मध्ये आहेत. शिव हा रुद्र, भूतपती, गिरीश, भव, शर्वर, गौरीशंकर, त्रिपुरारी, नीलकंठ, महादेव, पशुपती, त्रिलोचन, गिरीत्र, जटाधर, चंद्रशेखर, कृत्तिवासस्, महेश, महादेव, महेश्वर, त्र्यंबक, उमापति, शंकर, शंभू, ईश्वर, विश्वनाथ, पशुपतिनाथ, नीलकंठ, पंञ्चानन, नटेश, सदाशिव, दक्षिणामूर्ति, गंगाधर, नटराज, शूलपाणी, विश्वमूर्ती, शेखर, विश्वदेव, कालारी, पिनाकी, चंद्रशेखर, भवसृज, शशांक, सोमनाथ, प्रमथनाथ, वैद्यनाथ, मृत्युंजय, केदार, विश्वनाथ, विश्वरूप, अर्धनारीश्वर, भूतनाथ इत्यादी नावाने ओळखले जाते.

भारतीय कलेमध्ये शिव रूपाचे अंकन तीन स्वरूपात पाहावयास मिळते ज्यामध्ये लिंग रूप, पशु रूप आणि मानव रूप असे आहेत. शिवमत मानणाऱ्या शैव मतातून पाशुपत, कालामुख, कापालिक आणि वीरशैव असे वेगवेगळे संप्रदाय निर्माण झाले. भारतीय परंपरेत शैवमताचा प्रभाव येथील शासकांवर पडलेला दिसून येतो. अनेक राजवंशांनी आपल्या आराध्य देवतेच्या रूपाने शिवाचा स्वीकार केला होता. या राजवंशाच्या उपाधी पण शिव संबंधित होत्या. जसे की शिवश्री, शिवस्कंद, शिवदत्त इत्यादी. यासोबतच कुशाण शासकही स्वतःला शिवभक्त समजत. शिवाची आयुधे ज्यात परशु, त्रिशूल, मृग, डमरू, मुंडमाला, नाग, व्याघ्रचर्म, गण, भूत, पिशाच्च अंकित केले जातात. शिवाच्या शांत, संहार आणि अनुग्रह मूर्ती कोरण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात रावणानुग्रह शिवमुर्तीचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

शोध निबंधाचा उद्देश :- शिवाच्या अनुग्रह मूर्ती पैकी वेरूळच्या कैलास लेणी मध्ये असलेल्या मुख्य मंदिराच्या दक्षिण पीठा वरील रावणानुग्रह शिल्पाचा मूर्ती शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

महत्वपूर्ण शब्द :- शिव, अनुग्रह, मंदिर, लेणी, दशानन, रावण इ.

स्थान :- औरंगाबाद पासून पंचेचाळीस किलोमीटर अंतरावर.

मुख्य विषय :- भारतीय मूर्ती कलेमध्ये शिवाच्या पाच प्रकारच्या मूर्ती आढळून येतात.

1.मंगलकारी शांत मूर्ती
2.अनुग्रह मूर्ती
3.दक्षिणा मूर्ती
4.नृत्य मूर्ती
5.संहार मूर्ती

शिवाच्या अनुग्रह मूर्तीत रावणानुग्रह, चंडेशानूग्रह, विष्णुवानुग्रह, मार्कंडेयानुग्रह, अर्जुनानुग्रह, नंदीशानुग्रह आणि विघ्नेश्वरानुग्रह अशा अनुग्रह मूर्ती कोरण्यात आलेल्या असून त्यातील सर्वाधिक लोकप्रिय म्हणजे 'रावणानुग्रह' शिल्प होय.

वाल्मिकीकृत रामायणातील उत्तर कांड अध्याया नुसार, दशानन आपला भाऊ कुबेर यास पराजित करून आकाशमार्गे लंकेला जात असताना त्याचे विमान कैलास पर्वतावरून गतीहिन होऊन अचानक थांबले. आपले विमान

थांबलेले पाहून दशानन रागात येऊन विमानातून खाली उतरले. त्यावेळी वानर मूख धारण केलेल्या नंदिकेश्वराने रावणाला कैलास पर्वतावर शिव पार्वती विहार करत असल्याने; देव, दानव, गंधर्व अशा कुणालाही कैलास पर्वतावर जाण्याची अनुमती नाही, असे सांगितले. हे ऐकून दशाननाला भयंकर राग आला आणि दशननाने नंदीकेश्वराचा अवमान करायला सुरुवात केली. यातून दशानन व नंदिकेश्वर यात संघर्ष झाला. रावणाने कैलास उचलण्याचा निर्णय घेतला. रावणाच्या या प्रयत्नाला किंचितही यश आले नाही. परंतु कैलास पर्वतावर कंपने निर्माण झाली. याकरिता कैलास पर्वतावरील पशु-पक्षी भयभीत होऊन इतस्त पळायला लागली. ही स्थिती पाहून पार्वतीने भयवश शिवास घट्ट पकडले, शिवने मात्र आपल्या स्वभावानुरूप शांत बसून केवळ पायाच्या अंगठ्याने कैलाश पर्वताला दाबून धरले. परिणामस्वरूप रावणाच्या सर्व भुजा कैलास पर्वताच्या वजनाखाली दाबल्या जाऊ लागल्या. दशानन 'रुदन' करायला लागला. हजार वर्ष दशानन 'रुदन' करत राहिला. त्या मुळे दाशाननाचे नाव 'रावण' असे पडले. स्वतःची सुटका करून घेण्यासाठी दशाननाने 'शिवस्तुती' करायला सुरुवात केली. ही शिवस्तुती म्हणजेच 'शिव-तांडव' स्तोत्र होय. रावणाच्या प्रार्थनेवर प्रसन्न होऊन शिवाने रावणानुग्रह करीत रावणास 'चंद्रहास' नावाचे खड्ग प्रदान केले. सोबतच यावत्जीवन पृथ्वीवर राज्य करील असा आशीर्वाद दिला. (१)

दुसऱ्या एका कथेमध्ये रावणाने शंकराला लंकेत येण्याचे आवाहन केले. तेव्हा आपण कैलास सोडून जाऊ शकत नसल्याचे शिवाने त्याला सांगितले. त्यावर उपाय म्हणून रावणाने कैलासासह शिवपार्वतीस लंकेत न्यायचे ठरविले. म्हणून कैलास पर्वत उचलून नेण्याचा प्रयत्न त्याने केला. शंकराने कैलास हलल्यास ब्रम्हांडाचे संतुलन बिघडेल म्हणून आपल्या उजव्या पायाचा अंगठा दाबून त्याला स्थिर केले, तसेच रावणाचे दमन केले. रावणाची भक्ती पाहून शिवाने त्यास 'चंद्रहास' नावाची तलवार दिली. या कथेवर आधारित शिल्प वेरूळ मध्ये अनेक ठिकाणी कोरलेले दिसते. (२)

तिसऱ्या कथेमध्ये शंकर-पार्वती यांच्यामध्ये काही कारणाने विसंवाद निर्माण झाला होता. त्यामुळे शिवाने पार्वतीचा रुसवा काढण्यासाठी रावणाला कैलास हलविण्यासाठी प्रोत्साहित केले. रावणाच्या या प्रयत्नामुळे पार्वतीचा रूसवा गेला म्हणून रावणा वर शिव प्रसन्न झाले. अनुग्रह या कथेवर आधारित संभवता भारतातील हे एकमेव शिल्प असावे. (३)

कालिदासाच्या रघुवंश या काव्यात दशानन द्वारा कैलास पर्वत उचलणे आणि भयभीत पार्वतीचे शिवास बिलगणे याचा संदर्भ उपलब्ध होतो. (रघुवंश ४/८०,१२/८९,) तसेच कुमारसंभव महाकाव्यात उल्लेख आलेला आहे. (८/२४)

वेरूळची लेणी क्रमांक 16 ही कैलास लेणी या नावाने ओळखली जाते. या कैलाश मंदिरावर एकूण तीन रावणानुग्रह शिल्प कोरलेली आहेत. यापैकी देशातील सर्वोत्कृष्ट शिल्प म्हणून जे रावणानुग्रह शिल्प ओळखले जाते. ते म्हणजे कैलास मंदिराच्या दक्षिण बाजूकडील भद्र व उपपिठावर अंकित रावणानुग्रह शिल्प होय. पर्वतावर शिवपार्वती विराजमान असून शिव अर्धपर्यंक आसनात बसलेले दाखवले आहेत. तर पर्वताच्या खाली आपण हा पर्वत सहज उचलू शकू अशा अविर्भावात असलेला अज्ञान रूपी दशानन कोरलेला आहे. कैलाश पर्वत उचलत असताना रावण वीरासनात बसून आपल्या वीस हातांनी कैलास पर्वत उचलण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. रावणाच्या या प्रयत्नाने कैलास वर भूकंप समान धक्के बसत असल्याने, पशुपक्षी दास-दासी घाबरून पडताना दिसत आहेत. यावेळी रुसलेली पार्वती भयभीत होऊन आपले दोन्ही पाय आसनावर लांब ठेवून अचानक शिवाच्या दंडाला पकडले आहे. पार्वतीची दासी भयभीत होऊन पळत असताना, आता तरी या दोघांमधील भांडण मिटले की नाही. अशा शंकेने ती शिवपार्वती कडे पाहत आहे. जणू काही स्त्री सुलभ उत्सुकता इथे कलाकार कोरण्यात यशस्वी झाला आहे. भीतीने पळत असताना या दासीचा सुटलेला अंबाडा ही कलाकाराने यथायोग्य कोरलेला आहे. दासीचा पळतानाचा असलेला वेग सहज नजरेत भरतो. शिवगण दगडांचा वर्षाव दशानन वर करीत आहेत. वादन करणारे कलाकार पळण्याच्या तयारीत असून आपली वाद्ये खांद्यावर घेतली आहेत. कैलास पर्वतावरील ऋषी ही भयभीत होऊन शिवा कडे पाहत आहेत. शिव मात्र शांत बसलेले असून आपल्या डाव्या पायाने कैलासावर दाब देत आहेत. हा दबाव रावण सहन करू शकत नाही, रावणाच्या चेहऱ्यावरील दुःख स्पष्ट दिसते. दशाननाचे शरीर सौष्ठव स्पष्ट नजरेत भरते. कैलास पर्वताच्या दोन्ही बाजूस दोन शिवगण असून एका गणाच्या हातात त्रिशूल दिसते तर दुसऱ्या गणाच्या हातातील आयुध स्पष्ट नाही. दशाननाचे पृष्ट दर्शन होत असून डोक्यावर उंच मुकुट आणि सुंदर अलंकाराने विभूषित कोरलेले आहे. प्रस्तुत शिल्पात रावणाच्या दहा मुखांपैकी पाच मुखे वृत्ताकार कोरलेली आहेत. रावणाच्या कैलास पर्वत

उचलण्याच्या प्रयत्नाला पाहून पार्वती, दास-दासी, शिवगण, पशुपक्षी, ऋषी मुनी हे सर्व भयभीत झालेले आहेत. हे भयभीत वातावरण अंकित करण्यात कलाकारांना कमालीचे यश प्राप्त झाले आहे. प्रस्तुत शिल्पात भयभीत पळणारी पार्वतीची दासी, तिचे ते रूप अतिशय मनोहरी कोरण्यात आलेले आहे. [४]

कैलास मंदिरातील लंकेश्वर गुहेत प्रदक्षणा पथावर पूर्व भिंतीला असेच एक रावणानुग्रह शिल्प आहे. तर दुसरे शिल्प कैलास मंदिराच्या बाह्य भिंतीवर दोन विशाल काय व्दारपालांच्या मध्ये कोरलेले आढळून येते. असे एकूण तीन शिल्प कैलास मंदिर लेणी क्रमांक 16 मध्ये पहावयास मिळतात.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की,

१) कैलास मंदिरावरील दक्षिण बाजूच्या बाह्य भिंतीवर किंवा दक्षिणी भद्रा वर कोरलेले रावणानुग्रह शिल्प केवळ राष्ट्रकूट कालीन कलेचे उत्तम उदाहरण नसून भारतीय मूर्ती कलेतील सर्वश्रेष्ठत्तम उदाहरण आहे.

२) रुसलेल्या पार्वतीचा रुसवा दूर करण्यासाठी रावणाला कैलाश पर्वत उचलायला लावणे आणि शिवाची उद्दिष्टपूर्ती होणे. या अनुषंगाने कोरलेले कदाचित हे देशातील एकमेव शिल्प असावे. (लंकेश्वर गुहेतही असेच शिल्प आहे. परंतु कलेच्या दृष्टीने ते सरस नाही)

३) पराक्रमी रावणाचा अहंकार नष्ट करणे, जीवनात येणाऱ्या संकटावर शांतपणे कशी मात करावी. याचे उत्कृष्ट अंकन म्हणजे हे रावणानुग्रह शिल्प होय.

४) पुराण कथेतील नाट्यमय प्रसंगाला शिल्पांकित करून अजरामर करण्याचा प्रयोग कलाकारांनी यशस्वीपणे केला आहे. प्रस्तुत शिल्पात त्रिमितीय शिल्पाचा परिणाम दृग्गोचर होते.

५) कैलास लेणी मध्ये दोन प्रकारचे रावणानुग्रह शिल्प आढळून येतात. त्यातील एक प्रकार म्हणजे आपली नऊ डोकी शिवाला अर्पण करणे आणि दुसरे कैलास पर्वत उचलणाऱ्या रावणाचा अनुग्रह.

६) रावणानुग्रह शिल्पाला कैलास तोलन शिल्प असेही म्हणतात. अशी शिल्प भारतभर सर्वत्र आढळून येतात. परंतु वेरूळच्या कैलास लेणीतील भद्र पिठावरील दक्षिण बाजूस असलेले रावणानुग्रह शिल्प हे देशातील सर्वोत्कृष्ट शिल्प आहे. हे स्पष्ट होते.

७) प्रस्तुत रावणानुग्रह शिल्पात आपल्याला तीन प्रकारचे रस एकत्रित पहायला मिळतात. ते म्हणजे भय रस, वीर रस व शांत रस.

संदर्भ

1. रामायण उत्तरकांड (अध्याय १६/ ११-४४)
2. उदयन इंदुरकर, प्राचीन मंदिरे, मूर्ती आणि भावपूर्ण शिल्पे, भारतीय विचार साधना, पुणे, २०१७, पृ. ९६
3. कित्ता
4. रघुवंश
5. कुमारसंभव महाकाव्यम
6. प्रत्यक्ष सर्वेक्षण



श्री रवींद्र बोरावके सर यांच्या डिजिटल संग्रहातून साभार

